# उपनिबंधक, सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई

कोकण भवन, ३ रा मजला, रुम नं. ३११, नवी मुंबई ४००६१४

जा.क्र.मुंबई/एलवि/बी-३/विमोचित समाज हौ./क.७८अ/आदेश/१८/१७७ दिनांक- ८/१/२०१८

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अ अन्वये आदेश

वाचावे :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८अ मधील तरतुद.

२. विमोचित समाज को-ऑप. हौसिंग सोसा. लि. या संस्थेतील तक्रार दारांचे अर्ज

३. मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई या कार्यालयाकडील आदेश क्र. एचएसजी/बीसीएचएस/एफए/बी-१४५१ ऑफ १९६५ दिनांक ३१ मार्च १९६५

४. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (२) पूर्व उपनगरे, मुंबई यांचे कार्यालयाकडील जा.क्र. मुंबई/जिऊनि-२/बी-३/तक्रार/२८७८/सन २०१७, दिनांक १७/१०/२०१७ चे पत्र

५. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (२) पूर्व उपनगरे, मुंबई यांचे कार्यालयाकडील जा.क्र. मुंबई/जिऊनि-२/बी-३/तक्रार/२९१९/सन २०१७, दिनांक २२/११/२०१७ चे पत्र

६. या कार्यालयाचे जा.क्र.मुंबई/एलवि/बी-३/विमोचित समाज हौ./१६९४ /सन २०१७, दिनांक २८/७/२०१७ चे पत्र

७. या कार्यालयाचे जा.क्र.मुंबई/एलवि/बी-३/विमोचित समाज हौ./२७८४ /सन २०१७, दिनांक १२/१०/२०१७ चे पत्र

८. या कार्यालयाचे जा.क्र.मुंबई/एलवि/बी-३/विमोचित समाज हौ./३१०४/सन २०१७, दिनांक १६/१२/२०१७ चे पत्र

९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे कडील दिनांक १४/७/२०१७ चे तक्रारअ अर्ज

१०. मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगरे यांचे कार्यालयाकडील दिनां ४.११.२०१६ चे पत्र.

११. मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालयाकडील आदेश दिनांक .../२०१८

१२. या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस जा.क्र.मुंबई/एलवि/बी-३/विमोचित समाज हौ./१६/ सन २०१८, दिनांक ३/१/१८ चे पत्र

DEPUTY REGISTRAR, CO-OPERATIVE SOCIETIES, L WARD, MUMBAI

ज्याअर्थी, विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था म.,स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४. ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिय १९६० चे कलम ९ खाली नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून सदर संस्था या कार्यालयाच्या अधिपत्याखाली येते. आणि,

ज्याअर्थी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई या कार्यालयाकडील आदेश क्र. एचएसजी/बीसीएचएस/एफए/बी-१४५१ ऑफ १९६५ दिनांक ३१ मार्च १९६५ च्या आदेशान्वये संस्थेस रक्कम रु. ६५,८८६-७५ या प्रमाणे दोन हप्त्यामध्ये एकुण रक्कम रु. १,३१,७७३.५० पैसे कर्ज ३६ सभासदांना मिळून दिलेले आहे. शासनाने संस्थेस भरीव मदत/कर्ज दिल्याने सदर संस्थेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये कायदा कलम ७८ अ च्या परंतुकान्वये तरतूदी लागू होतात.

ज्याअर्थी विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४ या संस्थेला राज्य शासनाने २१९ युध्दोत्तर पुनवर्सन योजना अंतर्गत असलेल्या अटीने/शर्तीने मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, जिल्हा, मुंबई यांच्या दिनांक ८ मार्च, १९६० च्या आदेशाने, मौजे चेंबुर, सर्वे नंबर १४ पैकी ९० गुंठे जमिन मागासवर्गीय सभासदांच्या घरासाठी मुक्त महसुलाने कायम स्वरुपी प्रदान केलेली आहे. आणि

Scanned by CamScanner

२) मा. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, मुंबई उपनगर, मुंबई यांचे दि. ०४.११.२०१६ च्या पत्रात असे नमुद केले आहे की, *"परंतू आज रोजी कंर्जमंजुरीच्या यादीमधील दोन सभासद ह्यात आहेत. उर्वरित ३४ सभासद हे राजीनाम्याने/ वारसाने/ खरेदी विक्री व्यवहाराने आलेले आहेत. ३४ व कर्ज मंजूरी यादीतील २ सभासद या सभासदास समाज. कल्याण विभागाची कोणत्याही प्रकारची मान्यता दिल्याचे आदेश कार्यालयाच्या व संस्थेच्या दप्तरी दिसून येत नाही. हे कार्यालय सन २००० पासून नवनिर्मीत आहे. करीता यापुर्वी संदर्भ क्र. २ अन्वये संस्थेमध्ये प्रशासकाची नेमणुक होण्यासाठी विनंती करण्यात आली आहे. करीता प्रशासक नेमणुक होण्यास विनंती आहे."* अशाप्रकारे समाज कल्याण विभागाने सभासदांच्या मान्यतेचा बाबीमुळे प्रशासक लावणेबाबत विनंती केली आहे

३) मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे, जिल्हा यांनी उक्त संस्थेविरुध्दच्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार, संस्था व संबंधीतांना सुनावणी देवून दि. ०९.०१.२०१८ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यातील निर्ष्कषात नमुद केलेले मुद्दे पूढील प्रमाणे आहेत.

*निष्कर्ष ४) मुळ ३६ सभासदांपैकी ज्या लोकांना कर्ज मंजुर झाले होते त्यापैकी फक्त २ सभासद संस्थेत आहेत. बाकीचे ३४ सभासद बदललेले आहेत. संस्थेने शासन मान्यता प्राप्त मुळ सभासदांच्या जागी घेतलेल्या सभासदांना समाज कल्याण विभागाकडून मान्यता देण्यात आलेली नाही.*

*निष्कर्ष ५) संस्थेने शासनाची/ या कार्यालयाची पुर्वपरवानगी न घेता मेसर्स दिप्ती बिल्डर्स प्रा. लि., यांचे समवेत विकास करारनामा केला आहे. विमोचित समाज गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष, मा. सचिव, व खजिनदार म्हणून ज्या लोकांनी विकास करारनाम्यावर स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत त्यांच्या सभासदत्वास समाज कल्याण विभागाची मान्यता नाहीत.*

*निष्कर्ष ६) संस्थेने समवेत करण्यात आलेल्या करार नाम्यामध्ये परिशिष्ट २ मधील अट क्र. २ नुसार संस्थेला त्यांचे कोणत्याही सभासदाला या शासनाच्या संबंधित विभागाची पुर्व परवानगी शिवाय त्यांची सदनिका विक्री/ हस्तांतरण/ तारण अथवा पोटभाड्याने देणेस परवानगी देता येणार नाही. तथापी संस्थेच्या कोणत्याही सभासदाने किंवा संस्थेने त्यांच्या सदनिका विक्री/ हस्तांरण करणेपुर्वी या कार्यालयाची पुर्व परवानगी घेतली नसल्याने उपरोक्त अटीचा भंग झाला आहे.*

तसेच सदर दि.९/०१/२०१८ च्या आदेशातील मुद्दे पुढील प्रमाणे आहेत.

*मुद्दा क्र.२) शासन मान्यतेशिवाय सामावून घेतलेल्या सभासदांचे सभासदत्वास मान्यता घेण्यासाठी संस्था पीडब्ल्यूआर २१९ योजनेखालील मागासवर्गीय प्रवर्गातील असल्याने संस्थेने विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, उपनगर यांचेशी संपर्क साधून संस्थेने सभासदांच्या पात्रता निकषाची कागदपत्रे व ठरावासह परिपुर्ण प्रस्ताव त्यांचेकडे सादर करावा. व सभासद हस्तांतरणास या आदेशाचे तारखेपासून ६ महिन्यात मान्यता घ्यावी.*

*मुद्दा क्र.४) शासनाची/ या कार्यालयाची पुर्व परवानगी न घेता मे. दिप्ती बिल्डर्स युनिवर्सल प्रा. लि.,यांचे समवेत समाज कल्याण विभागाची मान्यता नसलेल्या सभासदांनी केलेला विकास करारनामा रद्द करण्यात यावा असे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधीत विभागास कळविण्यात यावे. तसेच संस्थेला प्रदान केलेल्या जागेवरील कोणत्याही प्रकारच्या बांधकामास या कार्यालयाचे नाहरकत पत्राशिवाय परवानगी देवू नये असे कळविण्यात यावे.*

उपरोक्त नमुद सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग, यांचेकडील दि. ०४.११.२०१६ रोजीचे पत्र व मा. जिल्हाधिकारी मुबई उपनगरे यांचेकडील दि. ०९.०१.२०१८ चे निष्कर्ष व आदेश यांचे अवलोकन केले अराता पुढील बाबी निर्दशनास येतात.

a) मा. जिल्हाधिकारी मुबई उपनगरे यांचेकडील दि. ०९.०१.२०१८ यांचे आदेशातील मुद्दा क्र-५ व ८ नमूद केल्यानुसार शासनाची/जिल्हाधिकारीची कार्यालयाची पुर्व परवानगी न घेता पुनर्विकासाबाबत करार केला आहे.दि. ०९.०१.२०१८ रोजीच्या आदेशात संस्थेस विकासकरारनामा करावयाचा झाल्यास करार नाम्याचे प्रारुप जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूर करुन घेणे बंधनकारक राहिल असे बृहन्मुंवई महानगर पालिकेच्या संबंधीत विभागास कळविण्यात यावे असे मा.जिल्हाधिकारी यांनी नमूद

Scanned by CamScanner

केले आहे. त्यामुळे संस्थेत शासनाच्या/संबंधित विभागाच्य आवश्यक मान्यता न घेता कामकाज केले आहे असे दिसून येते.

b) मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे, जिल्हा यांचेकडील दि.९.०१.२०१८ च्या आदेशातील उक्त नमूद केलेल्या निष्कर्ष क्र. ७ वरून असे दिसून येते की, सभासदांची शासनाच्या अटी/शर्तींचा भंग केला तरी संस्थेने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

c) मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे, जिल्हा व समाज कल्याण विभागाकडील पत्रांमध्ये नमूद केल्यानुसार संस्थेत सद्यस्थितीत केवळ २ सभासद मान्यताप्राप्त असून बदललेल्या ३४ सदस्यांना समाज कल्याण विभागाची मान्यता नाही.

संस्थेने समाज कल्याण विभागाकडे, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे, जिल्हा कार्यालयाकडे इच्छुक सभासदांचे सभासद बदल/हस्तांतर प्रस्ताव सादर केलेले नाहीत व त्यांचे मान्यतेसाठी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

(१) **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(अ)(१) मध्ये केलेली तरतूद** समितीस निष्प्रभावित करण्याचा किंवा तिच्या सदस्यांना काढून टाकण्याचा अधिकार (१) निबंधकाच्या मते समितीने किंवा अशा समितीच्या कोणत्याही सदस्याने, संस्थेच्या किंवा तिच्या सदस्यांच्या हितास बाधक होईल अशी कोणतीही कृती केली असेल किंवा राज्य सहकार निवडणुक प्राधिकरणाने या अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निवडणुका घेण्यास कसुर केली असेल किंवा जेथे समिती किंवा अशा समितीचा सदस्य किंवा अशा समितीचा कोणताही सदस्य तिची किंवा त्यांची कार्ये पार पाडण्याचे टाळत असेल किंवा ती पार पाडणे थांबवली असेल अशी परिस्थिती उद्‌भवली असेल आणि संस्थेचे कामकाज ठप्प झाले असेल किंवा ठप्प होण्याची शक्यता असेल अथवा जेथे गंभीर वित्तीय नियम बाहय बाबी किंवा अफरातफरी उघडकीस आल्या असतील किंवा अशा आशयाचे न्यायिक निदेश देण्यात आलेले असतील किंवा जेथे सतत गणपूर्ती होत नसेल, तेथे किंवा निबंधकांच्या मते कलम ७८च्या पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या कारणावर सुधारात्मक उपाययोजना केल्या नसतील किंवा त्याचे अनुपालन केले नसतील तेथे किंवा जेथे अशा समितीचा कोणताही सदस्य या अधिनियमाद्वारे किंवा त्याखालील समितीचा सदस्य म्हणुन राहण्यास निरर्ह झाला असेल तेथे, निबंधक, समितीला किंवा यथास्थिती सदस्याला तिच्या किंवा त्याच्या कोणत्याही आक्षेपाविषयी कलम ७८च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे लेखी निवेदन करण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्याबाबत म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर व ती संस्था जिच्याशी संलग्न असेल त्या संघीय संस्थेशी विचार विनीमय केल्यानंतर नोटीसीमध्ये नमूद केलेले दोषारोप सिध्द झालेले आहेत आणि हा अधिनियम नियम व उपविधी यांच्या तरतूदीअन्वये संस्थेचे प्रशासन चालवले जाऊ शकत नाही. या निष्कर्षाप्रत आला असेल तर, त्याबाबतची कारणे नमूद करुन तो आदेशाद्वारे

(अ) (एक) समितीस निष्प्रभावित करील आणि
(दोन) सहा महिन्यांहून अधिक असणर नाही एवढया कालावधीसाठी संस्थेचा कारभार चालविण्यासाठी त्या समितीच्या जागी अशा प्रकारे निष्प्रभावित केलेल्या समितीचे सदस्य व वगळून ३ किंवा अधिक सदस्यांचा समावेश असलेली किंवा प्रशासक किंवा प्रशासकाची समिती जे संस्थेचे सभासद असणे आवश्यक नसेल, याची नियुक्ती करील.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(अ)(१) मधील तरतूद व उपरोक्त नमूद निष्कर्ष याबाबत हे स्पष्ट होते की, संस्थेने इच्छुक वारस सभासद यांना निश्चितपणे त्यांच्या सभासदत्वाच्या मुलभुत हक्कापासून व इतर सुविधेपासून वंचित ठेवले आहे. व त्यांचे हितास बाधा होईल असे कृत्य केले आहे. तसेच समितीने तिचे कर्तव्य पार पाडण्यात निष्काळजीपणा/ कसूर केली आहे. तसेच या कार्यालयाच्या दि. ०३.०१.२०१८ ची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८-अ (१-अ) च्या कारणे दाखवा नोटिसीला समिती सदस्यांनी समाधान कारक उत्तर दिलेले नाही. व त्यातील मुद्यांचे खंडन केलेले नाही. या सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८-अ (१-अ) अन्वये संस्थेचे सद्याची समिती निष्प्रभावित करुन समिती ऐवजी प्रशासकाची नियुक्ती करावी. अशी माझी खात्री झाल्याने मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

Scanned by CamScanner

त्या अर्थी, खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

-: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८-अ (१-अ) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारापरत्वे, मी, शिरीष सपकाळ, उपनिबंधक, सहकारी संस्था, एल-विभाग, मुंबई, विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कुर्ला (पू.), मुंबई-४०००२४ संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी श्री. सतीश काकडे, प्रमाणित लेखापरिक्षक यांची संस्थेची निवडणूक होवून नवीन व्यवस्थापक समिती गठीत होईपर्यंत प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यांत येत आहे.

सदर आदेश आज दि. ०८/०३/२०१८ रोजी माझे सही-शिक्क्यानिशी दिला असे.

DEPUTY REGISTRAR, CO-OPERATIVE SOCIETIES
उपनिबंधक, सहकारी संस्था
एल विभाग, मुंबई
L WARD, MUMBAI

( शिरीष सपकाळ )
उपनिबंधक,
सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई

प्रत-

१) श्री. संभाजी भाऊ भोसले
रो हाऊस ४, विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४

२) श्री. माधव चिगजी कवडे
रो हाऊस १२, विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४

३) श्री. भाऊ बाबुराव तपासे
विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४

४) श्री. रामकृष्ण महिपतराव कणसे
रो हाऊस ११ विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४

५) श्री. विनय पंडितराव पवार
रो हाऊस १०, विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४

६) श्री. निलेश अशोक जाधव
रो हाऊस ७, विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४

७) श्री, संताजी संभाजी भोसले
विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४

८) कुमारी माधुरी कवडे
रो हाऊस ६, विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४

९) श्रीमती शारदा शरदचंद्र कासार
रो हाऊस १३, विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४

१०) श्री. सतीश काकडे, प्रमाणित लेखापरिक्षक प्रशासक, विमोचित समाज सहकारी गृहनिर्माण गृहनिर्माण संस्था मर्या. स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पू.), मुंबई-२४
२/- संस्थेच्या दप्तराचा त्वरीत ताबा घेवून अहवाल सादर करावा.

११) व्यवस्थापक, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि./ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

१२) व्यवस्थापक, -------------------------------- इतर बँक

Scanned by CamScanner